# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १९/०९/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **सप्टेंबर महिन्याची दुसरी सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

२. नमुंमपाच्या प्रस्तावित सार्वजनिक रुग्णालय नेरुळ करिता वैद्यकिय उपकरणे मध्यवर्ती रुग्णालयीन सेवा उपकरणे, हॉस्पीटल व ऑफिस फर्निचर खरेदीच्या प्रशासकिय मंजुरी बाबत व रुग्णालयीन सल्लागार नेमणेबाबतचा सुधारीत प्रस्तावाबाबत.

३. नमुंमपाच्या प्रस्तावित सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व माता बाल रुग्णालय बेलापूर करिता वैद्यकिय उपकरणे मध्यवर्ती रुग्णालयीन सेवा उपकरणे, हॉस्पीटल व ऑफिस फर्निचर खरेदी करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**४ व ५. श्री. रामआशिष राजबली यादव, यांजकडून :-**

(४) प्र. क्र. ६ यादवनगर, येथे जलवाहिनी टाकणे.(५) प्र. क्र. ६ यादवनगर, येथे संपुर्ण विद्युत वाहिनी भुमिगत करणे.

**६ ते ८. सौ. सिंधु अरविंद नाईक, यांजकडून :-**

(६) प्र. क्र. ५०, वाशी, सेक्टर - १५ मधील पावसाळी पाणी वाहून नेणारी सर्व गटारे ही सिडकोने बांधलेली असून ती यु.सी.आर. (दगड बांधकाम) आहेत. सदर गटारे व त्यावरील पदपथ ही ३५ वर्षापूर्वीची आहेत. त्या गटाराची व त्यावरील स्लॅबची अवस्था अत्यंत दयनिय आहे. सदर गटारे दर आठ दहा दिवसांनी खचली जातात. सदर प्रभागातील शाळा व कॉलेजची संख्या पाहताना विद्यार्थ्यांची व पालकांची तसेच रहिवाशांची रहदारी पाहता जीवीतहानी होण्याची फार मोठी शक्यता आहे. तरी प्रभागातील सर्व गटारे तोडून नव्याने पावसाळी गटारे बांधणे. (७) प्र. क्र. ५०, वाशी, सेक्टर - १५ मध्ये सिडकोने अल्प उत्पन्न गटासाठी ३० वर्षापुर्वी घरे बांधली असून अशा वसाहतीची संख्या ८ आहे. सदर वसाहती अंतर्गत मलवाहिका व चेंबर्स उंदरानी पोखरले आहेत त्यामुळे गटारे तुंबण्याचे प्रकार वारंवार होवून नागरीकांना मलेरीया, डेंगु सारखे आजाराना बळी पडावे लागत आहे. तसेच परिसरात दुर्गंधी पसरुन सर्व ठिकाणी घाण साचली जाते. कंडोमिनियम मधील कामासंबंधी महानगरपालिकेच्या धोरणानुसार सर्व ठिकाणचे सिवरेज लाईन व चेंबर्सची दुरुस्ती व देखभाल करणे. (८) प्र. क्र. ५०, सेक्टर - १५ मधील मॉडर्न कॉलेज ते भाजपा कार्यालय जवळील गटारावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे. महानगरपालिकेच्या एकात्मिक नाला विकास कार्यक्रमाअंतर्गत सदर नाल्याच्या दोन्ही बाजूकडील नाला बंदीचे प्रस्ताव महासभेत मंजूर झाले आहेत. त्यामुळे दोन्ही भागामधील उर्वरीत गटारावर देखील स्लॅब टाकून तो बंद करावा.

**९ व १०. सौ. सुरेखा बंडू पाटील, यांजकडून :-**

(९) ऐरोली, से.९ विसर्जन तलाव विस्तारित व सुशोभिकरण करणे. (१०) प्र.क्र. १६, से.९ रहिवाशांच्या मागणीनुसार जय कालिका, मंगलमुर्ती, श्री साई बिल्डिंग मागील साईट येथे हायटेंशन मध्ये गार्डनची सुविधा करुन देणे.

**११ ते १३. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(११) प्र. क्र. २० अंतर्गत तळवली नाका येथे तळवली गावाच्या नावाची कमानी बनविणे. (१२) प्र. क्र. २० अंतर्गत गोठिवली, तळवली, रबाळे गांव व सेक्टर २९-३० येथे गावठाण व सिडकोच्या कच्च्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. (१३) प्र. क्र. २० अंतर्गत गोठिवली, तळवली, नोसील नाका, रबाळे व सेक्टर २९-३० या गावांना व सिडको नोडला खेळाचे मैदान मिळावे.

**१४ व १५. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

(१४) प्र. क्र. ७१, सेक्टर ३, नेरुळ, नवी मुंबई, येथील मोकळा भूखंड क्र. ७अे असून सदर मोकळया भूखंडावर गेली २७ वर्षापासून विभागातील जनतेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमाद्वारे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून सदर भूखंड गणेशोत्सवाकरिता कायमस्वरुपी आरक्षित करणे. (१५) प्र. क्र. ७१, सेक्टर ३, नेरुळ, नवी मुंबई, येथे समाज उपयोगी कारणाकरिता आरक्षित भूखंड क्र. ७बी राखीव असून सदर भूखंड अल्प उत्पन्न गटातील रहिवाशी असलेल्या वसाहती मध्ये असून विभागातील रहिवाशांना जवळ कोणत्याही प्रकारे जीवनावश्यक तसेच अत्यावश्यक सेवा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रहिवाश्यांच्या सुखसोयीकरीता उपरोक्त भूखंड क्र. ७बी दैनंदिन बाजार या व्यवसायाकरिता आरक्षित करणे.

**१६ ते १८. सौ. शुभांगी सर्जेराव सकपाळ, यांजकडून :-**

(१६) प्र. क्र. ३५, कोपरखैरणे, सेक्टर - १४, २२, २३, १६, १७ मधील सर्व पावसाळी गटारे तोडून नव्याने हेवीडयुटी बांधून त्यावर पाथवे बनवावे. (१७) प्र. क्र. ३५, कोपरखैरणे, सेक्टर - २२, २३ मधील सिडको वसाहती अंतर्गत जनरल निधीमधून मोकळया जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे. (१८) प्र. क्र. ३५, कोपरखैरणे, सेक्टर - १४, २२, २३ मधील गार्डनची नादुरुस्त खेळणी काढून नवीन खेळणी बसविण्यात यावी.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १९ सप्टेंबर २०१३.**